दिनांक 03/07/2025

# :: प्रेसनोट ::

## " मा. अबिनाश कुमार साहेब, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी केमिस्ट असोसिएशन तसेच मेडीकल मालक यांची बैठक घेवून नशेली औषधी गोळ्या (Tablet) विक्री न करण्यासबंधाने दिल्या सक्त सूचना"

नशेच्या आहारी जात असलेली नवीन पिढी व त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारी या बाबतचे गांभिर्य लक्षात घेवून यावर प्रभावीपणे चाप लावण्याच्या दृष्टीकोणातून मा. **अबिनाश कुमार** साहेब, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी आज दिनांक 03/07/2025 रोजी नांदेड जिल्ह्यातील **केमिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी तसेच मेडीकल मालक, FDA असीस्टंट कमिशनर यांची** संयूक्त बैठक घेवून नशेली औषधी गोळ्या (Tablet) मेडीकलमध्ये विक्री न करण्यासबंधाने सक्त सूचना दिल्या. त्याचबरोबर नशेली पदार्थाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर अन्न व औषध प्रशासन देखील कायदेशिर कार्यवाही करीत असून त्यासबंधाने सबंधीत विभागाचे अधिकारी व पोलीस अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या.

दिनांक 23/06/2025 पासूनच या बाबतीत कार्यवाही करण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये 1) श्री पंकज इंगळे, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन इतवारा,मोबाईल क्र.7972837836 नांदेड. 2) श्री दिपासिंग नेहल, पोहेकॉ/1040 पोलीस स्टेशन हिमायतनगर जि. नांदेड 3) श्री रुपेश दासरवार, पोहेकॉ/686 शहर वाहतूक शाखा, इतवारा, नांदेड 4) श्री प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/1742 पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड 5) श्री जसपालसिंघ कालो, पोना/2162 पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड यांचा समावेश आहे. सदर पोलीस पथके हे नांदेड शहरातील तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक मेडीकलवर, 24X7 मेडीकल शॉप, Drug Medicine Supply Chain, Prescription Medicine चा गैर वापर करणांऱ्यावर पोलीस प्रशासन, FDA, केमिस्ट असोसिएशन यांच्याशी समन्वये साधुन कार्यवाही करण्यासाठी लक्ष ठेवून आहेत. नशेली औषधी गोळ्या (Tablet) मेडीकलमध्ये विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभिर दखल घेवून कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचबरोबर FDA असीस्टंट कमिशनर यांनी माहिती दिली की, आम्ही 13 औषधी मेडीकल चेक केले असून त्यातील दोन मेडीकल मधील कांही औषधी हे संशयास्पद स्थितीत मिळून आले आहेत त्या सबंधाने योग्य ती कायदेशिर कार्यवाही चालू आहे. तसेच यापुर्वी पोलीस विभागाने देखील पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीत डोडा या अंमली पदार्थ बाळगणा-यांवर केली आहे. तरी यावर्षी माहे जानेवारी ते एप्रिल दरम्यान N.D.P.S.Act प्रमाणे 07 कार्यवाही करण्यात आल्या होत्या.माहे मे 2025 मध्ये स्पेशल ड्राईव्ह घेवून या एका महिन्यामध्येच 08 कार्यवाही केली असून त्यामध्ये नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या एका कार्यवाहीचा समावेश आहे. माहे जून 2025 मध्ये स्थानिक गुन्हे शाखेने एका कार्यवाहीत 182 किलो गांजा जप्त केला आहे.

त्याचबरोबर विशेष पोलीस पथक क्रमांक 01 मधील पोउपनि/पंकज इंगळे, मोबाईल क्र. 7972837836 यांनी 25 जुन रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन हदीत 03 ठिकाणी डोडा या अंमली पदार्थांवर कार्यवाही केली असून आज दिनांक 03.07.2025 रोजी विशाल मेडीकल महाराणा प्रताप चौक, येथे अचानक पणे भेट दिली असता तेथे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिपशन शिवाय प्रतिबंधित औषधी विक्री व साठा करत असल्याचे मिळून आले आहे. सदर मेडीकल चालक यांच्या विरुद्ध कायदेशिर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच यापुढे देखील माहिती प्राप्त होताच प्रभावीपणे कायदेशिर कार्यवाही करण्यात येणार आहे.

यान्द्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, नांदेड जिल्ह्यामध्ये कोणत्याही औषधी मेडीकल तसेच इतर ठिकाणी नशेली औषधी गोळ्या (Tablet) विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या बाबत जवळच्या पोलीस स्टेशन येथे तसेच वर नमुद विशेष पथकातील पोलीस अधिकारी पोउपनि/पंकज इंगळे, मोबाईल क्र. 7972837836 यांना माहिती देण्यात यावी. अशी माहिती प्राप्त होताच त्या बाबत गंभिर दखल घेवून N.D.P.S.Act प्रमाणे कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. व आपले नाव गोपनिय ठेवण्यात येईल.

मा. **अबिनाश कुमार** साहेब, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारी लक्षात घेवून विविध कायद्याअंतर्गत गुन्हेगारावर प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन गुन्हेगारी कमी करण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळवीले आहे. नशेली औषधी गोळ्या (Tablet) तसेच इतर नशेली पदार्थाचे सेवनाने नवीन पिढी नशेच्या आहारी जावून त्यांचे आयुष्य उध्वस्त होवू नये या करीता सर्वोतोपरी प्रयत्न असून त्या सबंधाने कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड.**